<u>प्रेस नोट</u>

<u>पोलीस आयुक्तालय ,अमरावती शहर</u>

<u>दिनांक २१.०७.२०१७</u>

पोलीस स्टेशन नागपुरीगेट हद्दीत दिनांक १८.०७.१७ रोजी १२.०० वा. दरम्यान मृतक नावेद इकबाल उर्फ पप्पु बॉडीबिल्डर वल्द मोहमद साबीर वय २८ रा. पठाणपुरा सुन्नी मस्जिदजवळ याचा सिंडीकेट बॅक समोर सेट्रंल बॅक चे एटीएम समोर, असोरीया पेट्रोल पंप येथे ५ इसमांनी धारधार शस्त्रानिशी वार करुन निर्घुण हत्या करण्यात आली होती. त्यावरुन अप.क्रं. २२४/१७ कलम ३०२,३४ भादवि चा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.

मृतक नावेद इकबाल उर्फ पप्पु बॉडीबिल्डर वल्द मोहमद साबीर वय २८ हा बॉडीबिल्डींग मध्ये २ वेळा विदर्भ श्री होता. गुन्हयातील आरोपी रहीम खान पठाण, बॉडीबिल्डर हा चालवित असलेल्या जिममध्ये मृतक सराव करीत होता. जिमचे मुळ मालक यांचेसोबत रहीम खान पठाण चा जिम चालविण्याचा भाडे करार दि. ०१.०८.१७ रोजी संपत होता. त्यानंतर मृतक नावेद इकबाल उर्फ पप्पु बॉडीबिल्डर वल्द मोहमद साबीर वय २८ हा दि. ०१.०८.१७ पासुन पुढे भाडे करारावर जिम चालविण्यास मुळ मालकाकडुन घेणार होता. या कारणावरुन आरोपीने वाद केला व यातुनच मृतकावर असोरीया पेट्रोल पंपाजवळ दिवसा यातील आरोपीतांनी जिवघेणा हमला करुन निर्घुण हत्या केली. सदर गंभीर गुन्हयामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता, संवेदनशिलता निर्माण झाली होती. निर्घुण हत्या करुन यातील आरोपी अमरावती सोडुन पसार झाले.

<u>मा. पोलीस आयुक्त श्री दत्तात्रय मंडलिक साहेब, श्री शशिकांत सातव, पोलीस उपायुक्त परिमंडळ १ यांनी वेळीच हालचाली करुन व मार्गदर्शन करून पो.स्टे. नागपुरी गेट, गाडगेनगर, कोतवाली, राजापेठ, गुन्हे शाखा, सायबर सेल येथील अधिकारी व कर्मचारी वेगवेगळे पथक आरोपी शोध कामी तयार केले.</u> आरोपी अमरावती शहरातुन नाशिक, नागपुर, यवतमाळ, अंजनगाव सुर्जी, अकोला येथे तपास पथके रवाना करण्यात आली होती. दिनांक २०.०७.२०१७ रोजी मिळालेल्या गुप्त बातमीवरुन लागलीच पथक रवाना केले. <u>**दि. २१.०७.१७ चे रात्री ०१.३० वा. अकोला येथुन अवघ्या ७२ तासाचे आत आरोपी १) रहीम खान कादर खान पठाण उर्फ रहीम बॉडीबिल्डर वय ३३ रा. पॅराडाईज कॉलनी, २) मोहसिन खान साजीद खान उर्फ जॉन वय २३ रा. हबीब नगर नं २ अमरावती**</u> यांना पो.स्टे. नागपुरी गेट येथील पोनि दिलीप चव्हाण, पोउपनि गिते, सपोउपनि रफीक, सपोउपनि संजय बाळापुरे, नापोशि अकील खान, हरीष इंगळे, विलास पोहळेकर यांनी सापळा रचुन मोठया शिताफीने ताब्यात घेतले व अटक केली.

अटक आरोपी रहीम खान हा सन २०१६ चा मि. इंडीया चा गोल्ड मेडलिस्ट असुन नोव्हेंबर २०१७ मध्ये होणा—या मि. एशीया या स्पर्धेसाठी सिलेक्शन झाल्याचे चौकशीतुन निष्पन्न झाले आहे.

शहरात दिवसा झालेल्या निर्घुण हत्यामध्ये जनमानसात भितीदायक वातावरण निर्माण झाले होते. अवघ्या ७२ तासात यातील क्रुर आरोपीतांना अटक करण्यात आली असुन उर्वरीत आरोपीतांना लवकर अटक करण्यात येईल. सदर कार्यवाही ही मा. पोलीस आयुक्त श्री दत्तात्रय मंडलिक साहेब, श्री शशिकांत सातव, पोलीस उपायुक्त परिमंडळ १, सपोआ श्री गोर्डे गाडगेनगर विभाग यांचे मार्गदर्शनात वपोनि दिलीप चव्हाण, गुन्हे शाखेचे पोनि श्री प्रमेश आत्राम, पोउपनि गिते, सपोउपनि रफीक, सपोउपनि संजय बाळापुरे, नापोशि अकील खान सर्व पो.स्टे. नागपुरी गेट यांनी दिवस रात्र मेहनत करुन २ आरोपींना अटक केली आहे.